REGISTERED No. B. 3434

**अर्थ**

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें साप्ताहिक.

**प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.**

*वर्गणीचे दर :*

**वार्षिक : ६ रु.** **सहामाही : ३ रु.**

**किरकोळ अंक : ४ आ.**

*जाहिरातीचे दर :*

कराराच्या व इतर अटी जाहिरातखात्याकडून मागवाव्यात.

चेक, मनिऑर्डरी, इ. पाठविण्याचा पत्ता:-

"अर्थ"

"*दुर्गाधिवास*" पुणें ४.

# अर्थ

वर्ष १५ | पुणें, बुधवार तारीख २९ जून, १९४९ | अंक २६

## दि सांगली स्टेट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., सांगली

( स्थापना सन १९२७ )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | ५,००,००० रु. |
| खपलेलें भांडवल | १,७६,१०० रु. |
| भरलेलें भांडवल | १,०३,२५० रु. |
| रिझर्व्ह व इतर फंड | १,१७,००० रु. |
| खेळतें भांडवल | ११,००,००० रु. |

या बँकेंत मुदतीच्या, सेव्हिंग व करंट ठेवी स्वीकारल्या जातात. बँकेचे सभासदांना, सोसायट्यांना व व्यक्तिशः भागीदारांना योग्य तारणावर कर्जें दिलीं जातात. सोन्याचे तारणावर सवलतीचे व्याजाचे दरानें कर्ज दिलें जातें. वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि. सातारा व इंडिया इक्विटेबल इं. कं. लि. कलकत्ता, या कंपन्यांचे विम्यांचे हप्ते स्वीकारले जातात. चेक-हुंड्यांची खरेदी-विक्री, सरकारी कर्जरोखे व शेअर्स यांची खरेदी-विक्री व व्याज-वसुली वगैरे

**सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार**

**या बँकेमार्फत केले जातात.**

**ना. पां. ठाणेदार**

मॅनेजर

## सारस्वत

## को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

[ स्थापना १९१८ ]



सारस्वत बँक बिल्डिंग, मुंबई ४ टे. नं. ३१६७५

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल ... | रु. | ५,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... | रु. | ४,२२,६०० |
| रिझर्व्ह ... | रु. | २,५६,९०० |
| ठेवी ... | रु. | ८५,४६,५०० |
| खेळतें भांडवल ... | रु. | ९३,४२,००० |

**वचतीच्या आकर्षक योजना**

सब-ऑफिस : —दादर— ( बी. बी. रेल्वे स्टेशनसमोर )

वा. पुं. वर्दे, बी. कॉम्., अध्यक्ष.

प. ज. देशपांडे, बी. कॉम्., सेक्रेटरी.

पाडव्याच्या सुमुहूर्तावर बँकेची शाखा मार्केट बेळगांव येथें श्री. शं. वि. संझगिरी, बी. कॉम्., सेक्रेटरी यांच्या देखरेखीखालीं सुरू झाली आहे.

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** बुधवार चौक, पुणें






## सर्व प्रसिद्ध माल

भिंतीला लावण्याचे रंग, छापण्याची शाई, एनॅमलचे कच्चे व पक्के रंग

| केळकर बंधू, बुधवार चौक, पुणें २ | केळकर बंधू, (शाखा) मेनरोड, नाशिक. |
|---|---|

(आमचेकडे निरनिराळ्या एजन्सीज घेतल्या जातात व आमच्या सुमारें १०० वर उपविक्रेत्यांमार्फत मालाचा प्रसार केला जातो.)


# विविध माहिती

**हिंदला व पाकिस्तानला इषारा**—निजामच्या कार्यकारी मंडळाचे माजी अध्यक्ष सर मिर्झा इस्माइल ह्यांनीं लंडनमधील स्पेक्टेटर पत्रांत एक लेख लिहिला आहे. अंतर्गत आणि बाह्य कारणांसाठी हिंदनें व पाकिस्ताननें परस्पर दोस्तीचा करार करणें फार आवश्यक आहे. नाहींतर पूर्वेकडून येणाऱ्या कम्युनिस्ट संकटाला तोंड देणें कठीण जाईल, असें मत त्यांनीं आपल्या लेखांत व्यक्त केलें आहे. सर मिर्झा इस्माइल पुढें म्हणतात, कीं सध्या अफगाण सरकारच्या ज्या हालचाली चालल्या आहेत त्यांच्या मागें रशिआचा हात असण्याचा संभव आहे. पाकिस्तानांतील टोळीवाले अफगाणिस्थानला मिळाले आणि त्यांना रशिआनें लष्करी मदत केली तर पाकिस्तानला हा हल्ला थोपवितां येणार नाहीं. पाकिस्तानच्या अफगाणिस्थानशीं असलेल्या सरहद्दी रक्षण करण्यासाठीं हिंदनें वचन दिलें तर मात्र वायव्य-प्रांतावर जमलेले सध्याचे राजकीय ढग वितळून जातील.

**परदेशी प्रवाशांपासून ब्रिटनची प्राप्ती**—१९४८ सालीं ब्रिटनमधील कोणत्याही उद्योगधंद्यानें माल निर्यात करून जेवढे डॉलर्स मिळविले, त्यापेक्षां अधिक डॉलर्सची प्राप्ती ब्रिटनला परकीय प्रवाशांपासून झाली. ब्रिटनमधील ट्रॅव्हल असोसिएशन ह्या संस्थेनें पुढील अंदाजी आंकडे प्रसिद्ध केले आहेत. एकूण ५,००,००० पाहुण्यांनीं ब्रिटनमध्यें प्रवास केला आणि त्या निमित्तानें ६३ कोटी रु. खर्च केले. त्यापैकीं २८ कोटी रु. अमेरिकन डॉलर्स आणि इतर देशांची दुर्लभ हुंडणावळ होती. चालू वर्षी ब्रिटनमध्यें ५,६०,००० प्रवासी येतील आणि वाटखर्चासुद्धां ७३ कोटी रु. खर्च करतील असा अंदाज आहे. वरील रकमेपैकीं २४ कोटी रु. डॉलर्सच्या रूपानें खर्च होतील असें वाटतें.

**पडीक जमिनीची लागवड**—मुंबई प्रांतांतील जवळजवळ १,४०,००० एकर पडीक जमीन यांत्रिक नांगरांच्या साह्यानें लागवडीखालीं आणण्यांत आली आहे. खाजगी शेतमालकांकडून यांत्रिक नांगरांची मागणी अधिकाधिक येत असल्यानें झेकोस्लोव्हाकिआकडे आणखी ५० नांगरांची मागणी नोंदविण्यांत आली आहे. सध्या १०० नांगर नांगरटीचें काम करीत आहेतच. सरकारनें सर्व प्रकारच्या जमिनीच्या नांगरणीसाठीं हे नांगर वापरून नंतरच त्यांची मागणी केली आहे.

**रशिआकडून गव्हाच्या नऊ बोटी येणार**—चालू महिन्यांत कलकत्ता बंदरांत ९ रशिअन बोटी ४२,००० टन गहूं घेऊन येणार आहेत असें समजतें. त्यांपैकीं दोन बोटी आलेल्याच आहेत. एकाच महिन्यांत हिंदुस्थानला धान्य घेऊन येणाऱ्या रशिअन बोटींची ही सर्वांत अधिक संख्या आहे.

**वृत्तपत्रांचीं कात्रणें**—ब्रिटनमधील प्रत्येक सरकारी खातें आपला उल्लेख असलेलीं वृत्तपत्रांतील कात्रणें मिळावीं म्हणून सुमारे १,००० पौंड वार्षिक खर्च करीत आहे. हीं कात्रणें पुरविणाऱ्या संस्था १,००० कात्रणांना १५पौंड १२ शिलिंग असा दर आकारतात. सरकारचें विमाखातें ६५,००० कात्रणें घेतें; जळणखातें ३०,००० कात्रणें घेतें. राजकीय पक्षांत हुजूरपक्ष ह्या सगळ्यांत अधिक म्हणजे दरवर्षी सुमारें ६०,००० कात्रणें घेतो. मेजर ॲटली ह्यांच्यापेक्षा मि. चर्चिल ह्यांचे उल्लेख वृत्तपत्रांतून अधिक येतात, असें आढळून आलें आहे.

**सिनेमागृहांतून वार्तापट**—हिंदमधील २०० पेक्षा अधिक बोलपटगृहांनीं हिंदुस्थानी, बंगाली तामिळी आणि तेलगू भाषांतून वार्तापट दाखविण्यास प्रारंभ केला आहे. ह्याशिवाय इंग्रजी वार्तापट दाखविण्यांत येतातच. ह्या वार्तापटांना नाममात्र भाडें ठेवण्यांत आलें आहे. त्यांची लांबी १,००० फूट असून ते पडद्यावर दाखविण्यास प्रत्येकीं ११ मिनिटें लागतात. ह्या वार्तापटांचें मासिक संकलन करून ते आणि १६ मिलिमीटरचे खास वार्तापट परदेशांत दाखविण्याची व्यवस्था करण्यांत येणार आहे. ह्या महिन्यांत काश्मीरसंबंधीं एक आणि खलाशांच्या शिक्षणासंबंधीं एक असे वार्तापट दाखविण्यांत येत आहेत.

**संयुक्त प्रांतांतील सहकारी संस्था**—संयुक्त प्रांतांतलि सहकारी संस्थांच्या विकासाचा आढावा घेण्याचें सरकारनें ठरविलें आहे. ही तपासणी करतांना सहकारी संस्थांचा अनुभव असलेल्या परकीय तज्ज्ञांची सल्लामसलतही घेण्याचा त्या सरकारचा विचार आहे. कमाउन टेकड्यांवर एक सहकारी वसाहत वसविण्याच्या कामांत मि. हॉपमन नांवाचा एक अमेरिकन आजच गढून गेलेला आहे. मि. हॉपमन ह्यांची ही कामगिरी संपल्यावर ते त्या प्रांतांत इतरत्रही ह्याच कामासाठीं फिरणार आहेत.

**संयुक्त प्रांतांत कोळशाची नवी खाण**—संयुक्तप्रांत सरकारनें धरणांच्या कामांत सल्लामसलत देण्यासाठीं कांहीं परदेशीय भूगर्भशास्त्रज्ञ आणले आहेत. हे शास्त्रज्ञ आपलें पहाणीचें काम करीत असतां मिर्झापूरपासून १५ मैलांवर त्यांना कोळशाच्या सांठ्याचा शोध लागला. अधिक शोध चालू असून कोळशाच्या दर्जाबद्दलच्या अहवालाची प्रांतिक सरकार वाट पहात आहे.

**ब्रिटनची मोटारींची निर्यात**—गेल्या मे महिन्यांत ब्रिटननें टूरिंग मोटारी आणि इतर व्यापारी उपयोगाच्या मोटारी मिळून आजपर्यंत सर्वांत अधिक मोटारी निर्यात केल्या. ह्या मोटारींची किंमत ६५,०६,००० पौंड भरली.

**सयामकडून तांदूळ मिळणार**—१९४९ सालीं सयामकडून हिंदुस्थानला ३,५०,००० ते ४,००,००० टन तांदूळ मिळण्याची शक्यता आहे, असें समजतें. गेल्या वर्षीपेक्षां चालू वर्षीची आयात जवळ जवळ दुपट आहे. सयामला पाहिजे असलेला ताग मात्र हिंदकडून निर्यातीवरील बंधनांमुळें मिळूं शकत नाहीं अशी सयामची तक्रार आहे.

**हुंडणावळीचा बदला**—हिंदी नोटांच्या बदला पाकिस्तानच्या नोटा, पाकिस्तान स्टेट बँक आणि सरकारी खजिन्याच्या कचेऱ्या ह्या ठिकाणीं मिळण्याची व्यवस्था ता. २९ जून, १९४९ पासून रद्द करण्यांत येईल असें पाकिस्तान सरकारनें जाहीर केलें आहे.

**ब्रिटनमधील परदेशी प्रवासी**—ब्रिटनच्या बोर्ड ऑफ ट्रेडचे अध्यक्ष, मि. हॅरोल्ड विल्सन ह्यांनीं असा अंदाज केला आहे कीं परदेशीय प्रवाशांपासून ब्रिटनला १९४९ सालीं ४ कोटी पौंडांची प्राप्ती होईल.

# अर्थ

बुधवार, ता. १९ जून १९४९





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

## इंग्लंडच्या लोकसंख्येंत घट

### आर्थिक कारणांचा परिणाम

इंग्लंडमधील लोकसंख्येचा सर्व दृष्टीनें अभ्यास करण्यासाठी ब्रिटिश सरकारनें एक रॉयल कमिशन नेमलें होतें. हें कमिशन ह्या विषयाचा अभ्यास गेलीं पांच वर्षें करीत होतें. आतां कमिशननें आपल्या अभ्यासाची फलश्रुति म्हणून २६० पानांची एक सरकार–पुरस्कृत पुस्तिका प्रसिद्ध केली आहे. कमिशननें काढलेला निष्कर्ष फार अर्थपूर्ण आहे. मातृ–पितृपदांच्या प्राप्तीबरोबर ज्या आर्थिक जबाबदाऱ्या अंगावर पडतात, त्या फार अवघड असल्यामुळें ब्रिटनमध्यें संततिनियमन करण्याची प्रथा बरींच जोडपीं पाळतात. त्यामुळें येत्या तीस वर्षांत ( म्हणजे ही प्रथा अशीच चालू राहिल्यास ) ब्रिटनच्या लोकसंख्येंत काळजी वाटण्याइतकी घट होईल, असा निष्कर्ष कमिशननें आपल्या अहवालांत नमूद केला आहे. लोकसंख्येंत होणाऱ्या ह्या संभाव्य घटीचीं आणखींही कारणें कमिशननें दाखवून दिलीं आहेत. त्यांपैकीं कांहीं पुढील प्रमाणें आहेतः–( १ ) राहत्या घरांचा तुटवडा ( २ ) स्त्रियांना कामधंदा करण्याची मोकळीक आणि संधि ( ३ ) क्लब्समधून वेळ खर्चण्याची स्त्रियांची वाढती प्रवृत्ति, इत्यादी. ब्रिटिश जनतेची प्रजोत्पादन क्षमता पूर्वींच्या पिढ्यांच्या मानानें कमी झालेली आहे असें मुळींच नाहीं. परंतु, आपल्यामागें आपली जागा भरून काढण्याइतकें मोठें कुटुंब निर्माण करण्यांत बहुतेक दांपत्यांना स्वारस्यच वाटत नाहीं. सरकारनें ह्या प्रवृत्तीला आळा घालण्यासाठी कांहीं प्रयत्न केले आहेत. तथापि, कांहीं श्रीमंत जोडपीं सोडलीं, तर मुलें असणाऱ्या पति-पत्नींपेक्षां मुलें नसणारीं किंवा कमी मुलें असणारीं जोडपीं आर्थिक दृष्ट्या सुस्थितींत असतात त्यामुळें मातृ–पितृपदाची जबाबदारी समजणारीं बुद्धिमान आणि विचारी जोडपीं जितक्या मुलांच्या पालन-पोषणाची आणि शिक्षणाची सोय करणें परवडत असेल तेवढींच मुलें होऊं देण्याची दक्षता घेतात. शिक्षणाचा खर्च सध्या फार वाढलेला असल्यानें एक किंवा दोन मुलें असणारीं कुटंबेंच आतां अधिक दिसूं लागलीं आहेत. व्हिक्टोरिआ राणीच्या कारकीर्दींत पांच ते सात मुलें असणें योग्य समजलें जात असे.

आर्थिक कारणांचा कुटुंबांवर होणारा परिणाम टाळण्यासाठी कमिशननें कांहीं उपाय सुचविले आहेतः—( १ ) कुटुंबांवरील करांचा बोजा अधिक हलका करणें. ( २ ) अपत्यांपायीं रोख रकमा देणें. ( ३ ) स्त्री गर्भवती झाल्याबरोबर कुटुंबाला भत्ता चालू करणें. ( ४ ) लष्करांत, वैमानिक दलांत अगर नौदलांत नोकरी करणाऱ्या अधिकाऱ्यांना मुलांबद्दल भत्ते सुरू करणें. ब्रिटनच्या रॉयल कमिशननें सुचविलेले हे उपाय विचार करण्यासारखे आहेत ह्यांत शंका नाहीं. उदा. सैनिकी अधिकाऱ्यांच्या मुलांबद्दलचा भत्ता देण्याची शिफारसच घेऊं. ब्रिटनमधील लष्करांत वरिष्ठ वर्गीय लोकांच्या मुलांनाच अधिकाराच्या जागा मोठ्या प्रमाणांत मिळत असत ही गोष्ट कांहीं गुप्त नाहीं. आर्थिक सुस्थिति आणि कर्तृत्व ह्या गोष्टी एकत्र सांपडतातच असें अजून सिद्ध झालेलें नाहीं. अर्थातच फक्त लष्करी अधिकारी वर्गाच्या मुलांकरताच भत्ता देणें राष्ट्रीय दृष्टीनें व सामाजिक समतेच्या दृष्टीनें कितपत योग्य ठरेल ? कमिशननें ब्रिटिश लोकसंख्येचा अभ्यास कोणत्या पद्धतीनें केला त्यासंबंधीं माहिती अद्यापि येथें उपलब्ध नाहीं. ब्रिटनमधील लोकसंख्येचे उत्पन्नाच्या दृष्टीनें वेगवेगळे गट पाडून, त्या गटांतून मुलें होऊं देण्याबद्दल काय प्रवृत्ति आढळतात ह्याचा अभ्यास करणें जरूर आहे. कमिशननें तसा अभ्यास केला असला तर ठीकच; नसेल तर मात्र त्याच्या अहवालाची उपयुक्तता बरीच कमी झाल्याखेरीज रहाणार नाहीं. आर्थिकदृष्ट्या बेताची परिस्थिति असलेलीं कुटुंबें संततिनियमन करीत असतात आणि वरिष्ठ वर्गीय कुटुंबें रहाणीचें फाजील उंचावलेलें मान कायम राखण्यासाठी तोच मार्ग अनुसरीत असतात. अशा परिस्थितींत कोणत्याही समाजाची संख्याच नव्हे, तर त्यामधील कर्तृत्वही उतरणीला लागल्याशिवाय रहात नाहीं.

---

**हैद्राबादमध्यें सहकारी शेतीची मध्यवर्ती संस्था**—हैद्राबादच्या लष्करी राजवटींतील सहकारी खात्याचे प्रमुख नवाब झान यारजंग बहादूर ह्यांनीं हैद्राबाद अग्रिकल्चरल कोऑपरेटिव्ह असोसिएशन ह्या संस्थेचें नुकतेंच उद्घाटन केलें. ह्या प्रसंगीं भाषण करतांना नवाबसाहेब म्हणाले : "ह्या संस्थेचा मुख्य उद्देश शेतकरी आणि शेतीच्या सहकारी संस्था ह्यांच्या हितसंबंधांचें रक्षण करणें हा आहे. शेती सुधारणें, शेतीच्या मालाचा उठाव करतांना दलालाची मदत न घेणें, शेतकऱ्याची सेवा करतांना नफ्याची दृष्टी न ठेवणें, इत्यादी उद्दिष्टें ह्या मध्यवर्ती संस्थेनें आपल्यापुढें ठेवलेलीं आहेत." ही मध्यवर्ती संस्था विविध प्रकारच्या सहकारी संस्था चालविणार असून हैद्राबाद संस्थानांत निघालेली अशा प्रकारची ही पहिलीच संस्था आहे."

**कलकत्ता येथें ऑटोमॅटिक टेलिफोन एक्सचेंज**—कलकत्ता येथें ऑटोमॅटिक टेलिफोन पद्धति सुरू करावयास ३४ कोटी रु. खर्च येईल. सध्या तेथें २०,००० टेलिफोन आहेत. त्यांऐवजी आतां ५१,००० टेलिफोनची व्यवस्था करण्यांत येईल. ह्या योजनेंत १४३ फूट उंचीच्या एका नऊ मजली इमारतीचाहि समावेश आहे. योजना पांच टप्प्यांत पुरी करण्यांत येईल.

**मध्यम वर्गीयांच्या रहाणीच्या खर्चाचा इं. नंबर**—कानपूर शहरांतील कामगारांच्या राहणीच्या खर्चाचें मान दर्शविणारे इंडेक्स नंबर संयुक्त प्रांत सरकार वक्तशीर प्रसिद्ध करीत असतें. आतां मध्यम वर्गीयांच्या खर्चाचें मान दर्शविणाऱ्या इंडेक्स नंबराचीहि व्यवस्था करण्यांत येणार आहे. १५ प्रमुख शहरांतील शिक्षक, वकील व वैद्य–हकीम–डॉक्टर ह्यांच्याकडून माहिती मागविण्यांत येत आहे. त्यांना दिलेल्या ४,००० तक्त्यांच्या आधारें इंडेक्स नंबर तयार करण्यांत येईल.

**पाकिस्तानांत तागाच्या गिरण्या**—पाकिस्तान ब्रिटनकडून तागाच्या तीन गिरण्या विकत घेणार आहे, असें समजतें. ह्या प्रत्येक गिरणींत १,००० माग असतील. सर्व गिरण्यांच्या यंत्रसामुग्रीला मिळून सुमारें ५,५०,००,००० पौंड खर्च लागतील.

## जागतिक खनिज तेलाचा पुरवठा व हिंद

हिंदच्या औद्योगीकरणाच्या दृष्टीनें खनिज तेलाची यापुढें जास्तच आवश्यकता भासेल. रस्त्यांची वाढ होऊन मोटारींचें दळणवळण, हवाई मार्गांचा जास्त प्रसार, जलवहातुकीची वाढ व इतर उद्योगधंदे यासाठी तेलाची मागणी वाढत जाईल. हिंदमध्यें डिगबोई येथें थोडें तेल मिळूं शकतें, परंतु बहुतेक तेल परदेशांतून आणावें लागतें. महायुद्धापूर्वी एकंदर १०२० लक्ष गॅलन आयातींपैकी ६३० लक्ष गॅलन आयात एकट्या ब्रह्मदेशांतून होत असे. थोडासा पुरवठा इराणकडून होई. महायुद्धांत ब्रह्मदेशचा पुरवठा बंद होऊन, इराण व बहारिन बेटें याकडूनच बहुतेक तेलाचा पुरवठा होत गेला. एकंदर आयातीच्या अडीच टक्के आयात अमेरिकेकडून होत आहे.

हिंदला दरवर्षी ३००० लक्ष गॅलन खनिज तेल लागेल असा अंदाज आहे. साखरेच्या कारखान्यांना पॉवर अल्कोहोल तयार करण्याची परवानगी दिली तर १५० लक्ष गॅलन्सचा पुरवठा होऊं शकेल. पॉवर अल्कोहोल पेट्रोल बरोबर एक-चतुर्थांश प्रमाणांत मिसळतां येतें. हिंदला खनिज तेलाचा पुरवठा कायमचा होण्यासाठी परदेशांवरच अवलंबून राहावें लागेल किंवा खनिज तेलाऐवजीं शक्ति-उत्पादनाचीं इतर साधनें वापरावीं लागतील. हीं साधनें म्हणजे विशेषतः वीज व इतर सर्पण. यांपैकीं निरनिराळया, दामोदर व्हॅली अथॉरिटी सारख्या, धरणांचें बांधकाम पुरें झाल्यास त्यामुळें विजेचा पुरवठा होऊं शकेल. साखर कारखान्यापासून तयार होणाऱ्या पॉवर अल्कोहोलचा पुरवठा एकंदर गरजेच्या पांच टक्केच असेल.

महायुद्धानंतरच्या काळांत जागतिक तेलाचा पुरवठा निदान ३६ टक्क्यांनीं तरी वाढला असावा. पुरवठ्याबरोबर युद्धोत्तर पुनर्घटनेच्या कामामुळें तेलाची मागणीहि वाढत चालली आहे. गेल्या दहा वर्षांत अमेरिकेचाच तेलाचा खप ७३ टक्क्यांनीं वाढला व इंग्लंडमध्यें ४५ टक्क्यांनीं वाढला.

जागतिक खनिज तेलाची वाटणी निरनिराळया देशांत कशी झाली आहे हें पाहाणें उद्‌बोधक आहे. डॉलर्स व स्टर्लिंग गट अशा दोन विभागांत ही वाटणी झाली आहे. सर्वांत जास्त तेलाचा वाटा अमेरिकन वर्चस्वाखाली आहे. खुद्द अमेरिकेंतील तेलाव्यतिरिक्त दक्षिण अमेरिकेंतील दोन-तृतीयांश तेल, कॅनडांतील निम्में तेल, मध्यपूर्वेकडील ४२ टक्के तेल व युरोपांतील एक-चतुर्थांश तेल एवढ्या सर्वांची मालकी एकट्या अमेरिकेकडे आहे. रशियांतील तेल रशियन मालकीचें आहे. बाकी राहिलेलें इतर सर्व तेल विशेषतः ब्रिटिश मालकीचें किंवा ब्रिटिश-डच अशा संयुक्त मालकीचें आहे. म्हणजे, जागतिक तेलाचा व्यापार व मालकी अमेरिका व ब्रिटन यांच्या हातांत प्रामुख्यानें आहे. या दोनहि देशांचा तेलावर भांडवली खर्च गेल्या चार-पांच वर्षांत वाढत आहे. तेलाच्या कायमच्या पुरवठ्याच्या दृष्टीनें सर्वांत महत्त्व मध्य-पूर्वेचें आहे. कारण, थोड्या वर्षांपूर्वीच्या एका अंदाजाप्रमाणें मध्य-पूर्वेच्या देशांतील सांठा ४१ टक्के आहे, अमेरिकेचा साठा सुमारें ३४ टक्के, रशियाचा साठा ९ टक्के व इतर साठा १० टक्के आहे. मध्य-पूर्वेकडील देशांवर अमेरिका व इंग्लंड यांचें वर्चस्व कां आहे, हें यावरून कळून येईल. मध्य-पूर्वेकडील तेलाचा धंदा परकीयांच्या हातीं आहे. जागतिक तेल-पुरवठा व धंद्याची मालकी हीं लक्षांत घेतां, हिंदनें पॉवर अल्कोहोल व वीज इत्यादींवरच मुख्यतः अवलंबून रहाणें दूरदर्शीपणाचें ठरेल.

## सद्यः स्थितीमधील कारखानदारांवरील ताण
## किंवा
## कारखानदारींतील कांहीं प्रश्न

*(आपल्या कित्येक कारखान्यांपुढें रोकड पैशाचा, मजूर-मालक संबंधांचा, जुन्या यंत्रांच्या जागीं नवीं बसविण्याचा, कच्च्या मालाचा, वहातुकीचा, किफायतशीर विक्रीचा, इत्यादि अनेक प्रश्न उभे आहेत. एका कारखान्यांत जबाबदारीचें काम करणाऱ्या एका स्नेह्याच्या पत्रांतील खालील अनुभव पुष्कळांना परिचयाचा वाटेल.)*

आमच्या कारखान्याच्या प्रश्नाचें स्वरूप गेल्या ८-१२ महिन्यांत पार पालटून गेलें आहे. कदाचित् सर्वच कारखान्यांची थोड्या-फार फरकानें कांहींशी अशीच स्थिति असावी.

पैसा पार नाहींसा झाला आहे. दैनंदिन खर्चाची मिळवणी करतां करतां नाकीं नव येत आहेत. सुदैवानें मालाला मागणी आहे. पण ती तावडतोबीची. थांबावयास सवड नाहीं. पुढचें पुढें. आतां नाहीं. कामगार हात वर करूनच उभे आहेत. कामांतील नुकसानी वाढत आहे. खर्चाचें प्रमाण वाढत आहे.' अन् हीं देणीं वेळच्या वेळेवर भागवता भागवता सारा दिवस निघून जातो. थकलेल्या शरीरानें संध्याकाळीं घरीं परततों.

पण सुटका नाहीं. कितीतरी प्रश्न डोक्यांत घोळत असतात-गोंधळ उडवीत असतात. विचारांचें रबर ताणणार तरी किती? सारे विचार खलास होतात-मन थकून जातें. अन् मग वर्तमानपत्रें, मासिकें, चित्रपट, नाहींतर वैयक्तिक राजकारण (?) यांत कांहीं तरी निराळें, निदान विरंगुळा सांपडतो कां पहाण्याकरितां मन शोध घेऊं लागतें!—

कारखाना शहरापासून दूर असण्यांत एक अडचण अशी कीं, कारखान्याच्या कामा-वेळे व्यतिरिक्त डोळयांसमोर पुन्हां तोच तो कारखाना, तींच तीं माणसें येतात. तेच ते लहान-मोठे अधिकारी, कामगार मंडळी असें कांहींसें होतें. त्यांत बायकामुलेंही कळत-नकळत ओढलीं जातात. अन् मग २४ अन् २४ तास कारखाना, कारखाना, कारखाना !!

कुठल्याहि जीवनांत हें असेंच असतें कांहींसं; नाहीं असं नाहीं. पण शहरी जीवनांत, ठरवलें तर कांहीं वेळ कां होईना, त्यांतूनच बाहेर पडणें शक्य असतें. तसं या औद्योगिक वसाहतींतून होत नाहीं.

म्हणून आम्हीं असं ठरवलं कीं, संध्याकाळीं कारखाना सुटल्यावर कारखान्याबाबत कोणीही बोलायचं नाहीं. बोलल्यास हजर असणाऱ्या सर्व मंडळींना चहा द्यावा लागेल. प्रत्यक्ष अनुभव असा, कीं चहा मिळण्याचे प्रसंगच जास्ती. ३-४ मंडळी जमलीं तर 'कारखाना' कांहीं वेळ तरी टळतो. दोनच दोन भेटले कीं ५-१० मिनिटांत 'कारखाना' आल्याशिवाय रहात नाहीं !!

व्यवसायाव्यतिरिक्त व्यासंग हवा हें खरें. पण, मला वाटतं, ती दृष्टि, तें कलात्मक जीवन, ती ऐपत, अभावानें जाणवते. आपल्या शिक्षणांत, आपल्या आर्थिक गरजांत व्यासंगाचें स्थान महत्त्वाचें आहे, याची जाणीव आहे. पण अशा व्यासंगाची-छंदाची तळमळ हवी, अन् पैशाची सवडहि हवी!

**पाकिस्तानांत जाणारीं हिंदी वृत्तपत्रें**—हिंदमधून पाकिस्तानांत पाठविण्यांत येणाऱ्या हिंदी वृत्तपत्रांवर ह्यापुढें जकात घेण्यांत येणार नाहीं असें पाकिस्तान सरकारनें हिंद सरकारला कळविलें आहे.

## हिंदुस्थानांतील गुळाचा धंदा

### चांगल्या दर्जाच्या गुळाचें उत्पादन

[ श्री. एस. एल. फणसळकर, एम. एस. ( अमेरिका, ) ए. आर. टी. सी. ( ग्लासगो ) ए. आर आय. सी. ( लंडन ) ह्यांच्या ह्या संबंधांतील योजनेची माहिती "अर्थां"च्या ता. १६ मार्च व ६ एप्रिलच्या अंकांत देण्यांत आली होती. त्यावर "एक गुऱ्हाळवाला" ह्यांचें एक पत्र २० एप्रिलच्या अंकांत प्रसिद्ध करण्यांत आलें होतें. श्री. फणसळकर ह्यांचें त्यास उत्तर खालीं दिलें आहे. ]

संपादक, 'अर्थ' यांना

स. न. वि. वि.

आपल्या ता. २० एप्रिलच्या अंकांतील 'एक गुऱ्हाळवाल्या'चें पत्र वाचलें. त्यांनीं आपल्या पत्रांत अभ्यासू रीतीनें जें विवेचन केलें आहे तें त्यांच्या प्रगमनशील विचाराचें द्योतक दिसतें व ते नवीन गोष्टींकडे पूर्वदूषित ग्रहानें बघणार नाहीत असें वाटतें. अशा चिकित्सक शेकतरी बंधूंचा प्रत्यक्ष परिचय झाला तर शेतीच्या धंद्यांत सुधारणा करूं इच्छिणाऱ्या आमच्यासारख्या माणसांना फार उपयोग होईल.

पत्रांत रा. 'गुऱ्हाळवाला' यांनीं केलेलीं विधानें जरा स्पष्ट रीतीनें मांडलीं तर त्यांचा माझ्या म्हणण्यास विरोध नाहीं असेंच दिसून येईल.

दिलेले खर्चाचे तपशील पहातां फक्त दोन गोष्टींशिवाय माझें व रा. गुऱ्हाळवाला यांचें एकमत दिसून येतें आणि त्या गोष्टी म्हणजे ( १ ) पाचट गोळा करणें व वहातूक, ( २ ) घसारा.

( १ ) माझ्या हिशोबांत पाचट गोळा करणें व वहातूक या करितां होणारा खर्च मी वेगळा दाखवला आहे. रा. गुऱ्हाळवाला हे "पाचट गोळा करणें व आणणें हें काम ऊंस तोडणी व वहातूक यांतच अंतर्भूत असतें" असें लिहितात. म्हणजे यासाठी होणारा खर्च अपरिहार्य आहे हें त्यांना मान्य आहे. मग तो गुऱ्हाळ खर्चीं घाला अगर ऊंस वहातुकींत घाला. शेतकऱ्याला तो करणें भाग आहे. मी फक्त तो गुऱ्हाळ खातीं दाखविला आहे व तो तेथेंच दाखविणें योग्य आहे असें मला वाटतें.

( २ ) माझ्या आकड्यांत घसाऱ्याकडे पडलेला आकडा यंत्रसामुग्रीची किंमतच जास्त असल्यानें सहाजिकच जास्त आहे.

आपल्या ह्याच विषयावरील मागील लेखांतील विवेचनावरून कोणाच्याही लक्षांत येईल कीं हल्लीं ज्या पूर्वापार पद्धतीनें गूळ केला जातो त्यांत सर्वच तऱ्हेनें फार नुकसान होतें. तें नुकसान टाळण्याकरितां जास्त जोरदार क्रशर्स वापरावेत तर जादा निघालेल्या रसांतील मळाचें प्रमाण वाढतें व त्याचा गुळाच्या रंगावर व टिकाऊपणावर नक्की परिणाम होतो. नवीन पद्धतींत रासायनिक द्रव्यांची व यंत्रसामुग्रीची मदत घेतल्यानें मळी पूर्णपणें काढतां येऊन गुळाच्या प्रतींत कुठल्याही तऱ्हेचा बिघाड तर होत नाहींच पण हमखास चांगला गूळ निघूं शकतो व त्यामुळें तेवढ्याच उसांतून थोडा जास्त व चांगला गूळ निघणें शक्य होतें. अशा रीतीनें एकाच हंगामांत जादा पैदास झालेल्या गुळाची किंमत जादा भांडवलावरील व्याज, घसारा, इत्यादींपेक्षां नक्की जास्त होऊन ऊंस करणाऱ्या शेतकऱ्याला थोडेंतरी जास्त उत्पन्न एकरीं येईल.

हल्लीं जग बदललें आहे व प्रत्येक ठिकाणीं शेतावरसुद्धां यंत्रीकरण ( mechanisation ) चालू आहे. अशा वेळीं आपल्या परंपरागत चालू असलेल्या गुळाच्या धंद्यांतही सुधारणा होणें जरूर आहे. ट्रॅक्टरनें नांगरणें आज अगदीं रूढ झालें आहे. परंतु ट्रॅक्टर्स प्रथम उपयोगांत आणतांना आपले शेतकरी त्याला किती विरोध करीत होते, हें आपणांस पूर्ण माहीत आहेच. या बाबतींत नांगरला लागणाऱ्या बैल - जोड्यापेक्षां ट्रॅक्टरला प्रथम खर्च कितीतरी जास्त येतो हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

दुसरे, दोनशें एकर ऊंसवाले शेतकरी यांस फारच थोडे हें मान्य आहे. परंतु हल्लीं सर्वच गोष्टी सहकार्यानें करण्याची स्तुत्य प्रथा पडत असल्यानें प्रत्येक खेडोपाडीं ही गोष्ट सहज शक्य आहे—नव्हे अत्यंत जरूर आहे.

रा. गुऱ्हाळवाला यांचें शेवटचें विधान कीं, साखर नमुन्याप्रमाणें तयार होईल पण गूळ होणें कठीण. परंतु नव्या पद्धतींत रासायनिक व यांत्रिक कंट्रोल असल्यानें रसांतील घाण जरूर तेवढ्या प्रमाणांत काढता येऊन एक जातीचा गूळ तयार करणें शक्य आहे.

कुठलीही गोष्ट नवीन सांगण्यांत आली अगर प्रचारांत आणण्यांत येऊं लागली कीं "ती गोष्ट अशक्यच" "तें असें होणें शक्यच नाहीं" असे प्रवाह ऐकूं येतात. पण कालांतरानें ते जातातही. त्याचप्रमाणें, अल्पावधींतच या गुळाच्या नवीन पद्धतीबद्दलही लोकांचें मन अनुकूल होईल अशी आशा आहे. कळावें.

फलटण आपला

६ जून, १९४९ श्री. ल. फणसळकर

---

**हिंदचा चित्रपट निर्मितींत दुसरा नंबर**—जगांतील चित्रपटांच्या निर्मितींचा एक आढावा संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या सांस्कृतिक शाखेनें नुकताच घेतला. त्यांत असें आढळून आलें कीं, अमेरिकेनंतर चित्रपट निर्मितींत हिंदुस्थानचाच अनुक्रम लागतो. अमेरिकेंत १९४८ सालीं ४००चित्रपट काढण्यांत आले. हिंदुस्थानांत २५० चित्रपट काढण्यांत आले. ज्या देशांतून चित्रपट निर्माण करण्याचा धंदा आहे अशा सर्व देशांनीं मिळून १९४८ सालीं १,५०० चित्रपट निर्माण केले.

**पोलादाचे नवे कारखाने**—हिंद सरकारच्या उद्योग आणि पुरवठा खात्यानें दोन पोलादाचे कारखाने काढण्यास अनुकूलता दर्शविली आहे. प्रत्येक कारखान्याची वार्षिक उत्पादनक्षमता ५ लाख टन असेल. दोन कारखान्यांऐवजी १० लाख टनाचा एकच कारखाना उभारावा असा निर्णय पूर्वी घेण्यांत आला होता. ह्यापैकीं एक कारखाना मध्यप्रांतांत आणि दुसरा ओरिसांत उभारण्यांत यावयाचा आहे.

**सोन्याचीं नाणीं पाडण्याचें कौशल्य**—सोन्याचीं नाणीं पाडण्याचें कौशल्य राखण्यासाठीं इंग्लंडच्या टांकसाळींत १,००,००० सॉव्हरिनचीं नाणीं मुद्दाम पाडण्यांत येणार आहेत. नवीन नाण्यांवर पांचवे जॉर्ज ह्यांची प्रतिमा आणि १९२५ सालच उठविण्यांत येणार आहे. कारण, ह्या नाण्यांसाठीं नवा ठसा न करतां १९२५ सालचा जुनाच ठसा वापरण्यांत येणार आहे. नवीन नाणीं प्रचारांत न आणतां तीं सोन्याचा सांठा म्हणून ठेवण्यांत येतील. नाण्यांची किंमत दर्शनी किंमतीच्या दुप्पट असेल. प्रचारांत वापरावयाचीं नाणीं म्हणून इंग्लंडमध्यें १९१७ सालापर्यंतच सॉव्हरिन्स पाडण्यांत आलें.

### युवर ओन प्रॉव्हिडंट इन्शुअरन्स कं. लि., मुंबई

१९४८ सालीं वरील कंपनीकडे ५ लाखांहून अधिक काम आलें, त्यांपैकीं ५ लाखांहून अधिक काम पुरें झालें. गेल्या वर्षांतील महाराष्ट्रामधील असामान्य बिकट परिस्थिति लक्षांत घेतां, कंपनीनें एवढें काम मिळविलें हें तिला भूषणावह आहे. नव्या कामाची तुलना करताना, "युवर ओन" ही प्रॉव्हिडंट कंपनी आहे हें लक्षांत घेतलें पाहिजे आणि त्यादृष्टीनें तिच्याइतकें काम मिळविणारी मुंबई प्रांतांत तरी दुसरी प्रॉव्हिडंड कंपनी नाहीं. तथापि, सर्व महत्त्वाच्या कसोट्यांच्या बाबतींत मात्र "युवर ओन" लाईफ व प्रॉव्हिडंट सर्व कंपन्यांत वरच्या दर्जाची ठरते. कंपनी पहिल्या मूल्यमापनांतूनच यशस्वी रीतीनें पार पडली होती आणि १९४८ अखेरच्या ताज्या मूल्यमापनांत तर तिनें उत्कृष्ट यश मिळविलें आहे. अॅक्चुअरी, प्रो. जी. एस. दिवाण, एम. ए., एफ. आय. ए., ह्यांनीं मूल्यमापन केलें आहे. त्यांत प्रत्यक्ष अनुभवास आलेल्या खर्चांच्या प्रमाणापेक्षां पुढें अधिक प्रमाण पडेल, ह्या दृष्टीनें भरपूर तरतूद केलेली आहे. ८,२८८ रुपयांचे वाढाव्यापैकीं ६,०५७ रुपयांचा विनियोग बोनस वाटण्याकडे करण्यांत यावयाचा आहे. म्हणजे, नफ्यासहित विम्यांस त्रैवार्षिक दरहजारी अनुक्रमें २४ व १८ रु. बोनस मिळेल. भागीदारांसहि १९४८ सालाकरितां २½% डिव्हिडंड मिळेल. जुन्या, मोठ्या व प्रथितयश कंपन्यांसहि अभिमानास्पद वाटण्याजोगी ही परिस्थिति आहे. तेव्हां "युवर ओन"च्या भागिदारांस व विमेदारांस ती विशेष आनंददायक वाटेल, ह्यांत आश्चर्य नाहीं. कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. कोल्हटकर ह्यांच्या दीर्घ स्वार्थत्यागाचें व मेहेनतीचें चीज होत आहे, ह्याबद्दल आम्हीं त्यांचें अभिनंदन करतों व कंपनीस अधिक भरभराट चिंतितों.

### साखरेचें जागतिक उत्पादन वाढत आहे

(आकडे हजार टनांचे)

| क्षेत्र | १९३५-३९ (सरासरी) | १९४६-४७ | १९४७-४८ | १९४८-४९ |
|---|---|---|---|---|
| उत्तर व मध्य अमेरिका | ७,८०१ | ११,४४६ | १२,००४ | ११,३१० |
| दक्षिण अमेरिका | २,४१४ | ३,१६६ | ३,१७१ | ३,१५१ |
| युरोप (रशिया वगळून) | ७,४०८ | ५,६१२ | ५,०३८ | ७,२५८ |
| आशिया (रशिया वगळून) | १०,८१३ | ७,३२५ | ८,३९८ | ९,८१४ |
| रशिया (युरोपांतला व आशियांतला) | २,८८७ | ७७५ | २,०५० | २,५८० |
| आफ्रिका | १,२९५ | १,३०० | १,४९० | १,५८६ |
| ऑस्ट्रेलिया | २,०८६ | १,६१४ | १,६८३ | २,०७० |
| एकूण | ३४,७०४ | ३१,३१८ | ३३,८३४ | ३७,६८९ |

### महाग हिंदी साखर कशी खपणार?

साखरचें जागतिक उत्पादन अशा रीतीनें वाढत असल्याकारणानें मागणी-पुरवठा न्यायानें हिंदी साखर-कारखानदारांच्या साखरेचा परदेशांत उठाव होणें कठीण जाणार आहे आणि ३६% संरक्षण देऊनच हा धंदा आज स्वदेशांत चालू आहे. हिंदी साखरेचा उत्पादन खर्च उतरविणें अपरिहार्य झालें आहे. त्याबाबत सत्वर उपाय योजना झाली पाहिजे. पाकिस्तानांत दरसाल २,५०,००० टन साखर खपते परंतु त्या देशांतील उत्पादन फक्त ३०,००० टन आहे. पाकिस्तानासारखी मोठी बाजारपेठ शेजारी असूनहि, हिंदी साखर महाग पडल्याकारणानें पाकिस्तान देश क्युबा, ब्राझील, पोलंड, इत्यादि देशांची साखर घेत आहे. साखरेचें संरक्षण चालू ठेवल्यानें केवळ धंद्याची वाढ होऊं शकणार नाहीं.

### हिंदचा विमा-व्यवसायः सुधारणा करण्याची एक दिशा.

गेलीं दोन वर्षें हिंदमध्यें निरनिराळ्या कारणांमुळें भांडवलाचा तुटवडा कसा भासत आहे याचें विवेचन ईस्टर्न एकॉनॉमिस्टनें केलेल्या संशोधनावरून पूर्वी एका लेखांत (अर्थाच्या ता. २३-२-४९ च्या अंकांत) केलें होतेंच. महायुद्धानंतर जी परिस्थिति निर्माण झाली त्यामुळें देशांतील उत्पन्नाचा जास्त हिस्सा शेतकरी व मजूरवर्ग यांच्या हातीं गेला, व ह्या वर्गांमध्यें भांडवल-संचय करण्याची किंवा शिल्लक टाकण्याची प्रवृत्ति नसल्यामुळें एकंदर देशांत भांडवलाचा तुटवडा भासत आहे. ही परिस्थिति सुधारावयाची म्हणजे शेतकरी-मजूर वर्गांत शिल्लक टाकण्याची प्रवृत्ति निर्माण केली पाहिजे. युनायटेड कमर्शिअल बँकेच्या वार्षिक सभेच्या वेळच्या अध्यक्षीय भाषणांत श्री जी. डी. बिर्ला यांनीं, बँकांनीं मोबाइल युनिट्स स्थापन करून शेतकरी-मजूरवर्गांत शिल्लक टाकण्याची वृत्ति निर्माण करावी अशी नुकतीच सूचना केली होती. हिंदचा विमा-व्यवसाय असावा तितका समाधानकारक स्थितींत नाहीं, व आयुर्विम्या व्यतिरिक्त इतर प्रकारच्या विम्यांत फारशी प्रगति झालेली नाहीं. पुढील काळांत राहाणीचें मान वाढविण्यासाठीं निरनिराळ्या प्रकारांनीं राष्ट्रीय उत्पन्न वाढविण्याबरोबरच समाजांतील कामगार व शेतकरी वर्गामध्यें विम्याचा प्रसार करणें जरूर आहे. विमा उतरण्याच्या बाबतींत जगांत अमेरिकन नागरिक सर्वांच्या पुढें आहे. कांहीं देशांचें दर माणशीं सरासरी वार्षिक उत्पन्न व दरमाणशीं सरासरी विम्याची रकम यांचे आंकडे पुढें दिले आहेत, ते उद्बोधक आहेत.

| देश | दर माणशीं वार्षिक उत्पन्न (रुपये) | दर माणशीं उतरलेल्या-विम्याची रकम (रुपये) |
|---|---|---|
| अमेरिका | १,४०६ | २,३०० |
| कॅनडा | १,०३० | १,५७३ |
| ब्रिटन | ९८० | ९७३ |
| ऑस्ट्रेलिया | ९७२ | ९६० |
| जर्मनी | ६०३ | २४० |
| हिंदुस्थान | ६५ | १२ |

जर्मनीव्यतिरिक्त इतर देशांत विम्याची रक्कम सरासरी वार्षिक उत्पन्नापेक्षां साधारणपणें जास्त आहे. परंतु हिंदुस्थानांत विम्याची रक्कम वार्षिक उत्पनाच्या एक-पंचमांशाहूनहि कमी आहे. या तुलनेवरून आजच्या परिस्थितींतहि विम्याच्या बाबतींत आपण किती मागें आहों हें स्पष्ट दिसतें. विम्याची वाढ उच्च व मध्यम वर्गांत झाली, परंतु बहुसंख्याक शेतकरी-कामगार वर्ग त्यापासून अलिप्त आहे. ही परिस्थिति प्रचार, शिक्षण व साक्षरता यामुळें हळू हळू सुधारूं शकेल. विमा-कंपन्यांना लाइफ फंडाची ५५ टक्के रक्कम सरकारमान्य कर्जरोख्यांतच गुंतवावी लागते. यामुळें विमा-कंपन्यांचे व्यवहार स्थिर व मजबूत पायावर असतात. गेलीं तीन-चार वर्षें आपल्याकडे असा अनुभव येत आहे कीं, लॅप्स होणाऱ्या पॉलिसींचें प्रमाण वाढत चाललें आहे. धंद्याच्या वाढीच्या दृष्टीनें ही गोष्ट अनिष्ट आहे. तेव्हां पॉलिसीज रद्द होणार नाहींत याकडे कंपन्यांचें व विमा उतरणारांचेंहि लक्ष पाहिजे. विमा उतरण्याची संवय ही उच्च पातळीच्या आर्थिक व्यवहाराची निदर्शक आहे. तेव्हां शेतकरी-कामगारवर्गांत विम्याचा प्रसार होणें आवश्यक आहे.

## अधिक धान्य पिकवा

### कळवण तालुक्यांतील यशस्वी कार्यक्रम

कळवण तालुका को-ऑपरेटिव्ह सुपरवायझिंग युनियननें कळवण तालुक्यांतील सोसायट्यांचे प्रमुख ठिकाणीं मुपत्रार सोसायट्यांच्या सभांचा अधिक धान्य पिकविण्यासंबंधीं खाली दर्शविल्याप्रमाणें ज्या त्या अध्यक्षांचे देखरेखीखाली कार्यक्रम पार पडला. त्यावेळीं सभेंत कळवण तालुक्यांतील सहकारी खात्याचे अधिकारी मि. व्ही. एन. तेली सुपरवायझर, व मि. एस. एन. ठोंके असिस्टंट को-ऑपरेटिव्ह ऑफिसर कळवण तसेच शेतकी खात्याच अधिकारी, पाटील-तलाठी व ज्या त्या भागाचे प्रमुख मंडळींनीं अधिक धान्य पिकविणेसंबंधीचे सरकारचे धोरणानुसार माहिती देऊन सवलतीबाबत माहिती दिली आहे व शेतकऱ्यांचे अडीअडचणिसंबंधी ठरावही झाले आहेत व या मोहिमेसंबंधी गांवी स्थानिक कमिट्याही नेमल्या आहेत.

| सभेचे अध्यक्ष | सभेचें ठिकाण | तारीख |
|---|---|---|
| १ श्री. दत्तात्रेय शंकर अभोणेकर | अभोणे | १०–६–४९ |
| २ श्री. दशरथ काळू देवरे | देवळे | १२–६–४९ |
| ३ श्री. बारीकराव माहिपतराव थोरात | पिंपळगांव | १३–६–४९ |
| ४ श्री. आर. पी. गुंजाळ, अ. डि. ॲग्रिकल्चरल ऑफिसर | कळवण | १५–६–४९ |
| ५ श्री. तुळसिराम शिवराम पा| | खामखेडे | १७–६–४९ |

### एक्सचेंज बँक ऑफ इंडिया अँड आफ्रिका लि., मुंबई

वरील बँकेचा व्यवहार गुंडाळण्यांत यावा असा हुकूम गेल्यां आठवड्यांत मुंबई हायकोर्टानें दिला. ऑफिशिअल लिक्विडेटरला बँकेचे लिक्विडेटर नेमण्यांत आलें. अर्जदार धनकोतर्फे अस सांगण्यांत आलें, कीं बँकेच्या मॅनेजिंग डायरेक्टान इंडियन ओव्हरसीज कं. लि.ला १ कोटी, २० लक्ष रु. कर्जाऊ दिले होते आणि त्या कंपनींत त्याला निर्णायक अधिकाराचें स्थान होत. हे पैसे परत मिळण्याचा संभव नाहीं, असेंहि अर्जदारानें सांगितलें.

### ३% लोन (१९४९–५२)

वरील कर्जरोखे धारण करणारांस त्यांच्या रोख्यांचें रूपांतर खालील कर्जरोख्यांत करतां येईल:—

(अ) २¾% लोन (१९५५)

अथवा

(ब) २¾% लोन (१९६२)

पहिल्या (अ) कर्जरोख्यांच्या विक्रीची किंमत १०० रु. च्या रोख्यास ९९ रु. १२ आ. अशी आहे.

दुसऱ्या (ब) कर्जरोख्यांच्या विक्रीची किंमत १०० रु. च्या रोख्यास ९९ रु. ८ आ. अशी आहे.

#### ६७ कोटी रुपयांचे रोखे

४ जुलै १९४९ ते ८ जुलै १९४९ ह्या मुदतींत हें रूपांतर करतां येईल.

३% १९४९–५२ च्या लोनची एकूण रकम ६७ कोटी रुपये आहे. कर्जरोख्यांपैकी बहुतेक रोखे रिझर्व्ह बँक व इतर बँका धारण करीत असल्यामुळें, रूपांतराची योजना यशस्वी होईल, अशी अपेक्षा आहे.


## दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखा:—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर (बेलापूर रोड), ओझर (जि. नाशिक)

पे-ऑफिस:—खोपोली (जि. कुलाबा)

श्री. बी. बी. वाळवेकर (अध्यक्ष) | श्री. के. पी. जोशी (उपाध्यक्ष)

अधिकृत भांडवल रु. १५,४३,८१०

विक्री झालेलें भांडवल रु. ७,९३,८१०

वसूल भांडवल रु. ३,९८,२९५

एकूण खेळतें भांडवल ५३ लाखांचे वर

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर.

## दि मोटार ओनर्स म्युच्युअल इन्शुअरन्स कं. लि. (बेळगांव)

पुणें शाखा:–९७४ सदाशिव, लक्ष्मी रोड.

मोटार मालकांनींच स्थापन केलेली, मोटारीचा विमा उतरणारी, मोटार मालकांचंच संचालक मंडळ असलेली व विमेदारांना हक्कानें शेअर्स देण्याची योजना आखणारी अखिल भारतांतील पहिलीच संस्था. प्रीमियमचे दर अत्यंत माफक व शिवाय अनेक सवलती. —एजन्सी व इतर माहितीकरितां चौकशी करा.— ब्रँच सेक्रेटरी

## दी बँक ऑफ औंध, लिमिटेड.

हेड ऑफिस:—१११।११२ सदाशिव पेठ, सातारा

शाखा:—औंध, आटपाडी, भवानीनगर व ओगलेवाडी.

मुंबई, पुणें, सांगली, सोलापूर, कऱ्हाड वगैरे ठिकाणांवर ड्राफ्ट्स् दिले जातात.

बचतीच्या आकर्षक योजना

★ मुदत ठेवी आकर्षक दरानें १ ते ५ वर्षे पर्यंत स्वीकारल्या जातात.

★ सेव्हिंग्ज बँकेत रु. १५,०००/– पर्यंत ठेव ठेवतां येते. खात्यांतून आठवड्यांतून दोनदा चेकनें रकमा काढतां येतात.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

विशेष माहितीसाठी लिहा अगर भेटा.

बा. रा. वर्तक, मॅनेजिंग डायरेक्टर.

### बोअरिंग मशीनच्या खोदकामाचे ठरविलेले दर

डायरेक्टोरेट ऑफ ॲग्रिकल्चरल इंजिनियरिंगतर्फे बोअरिंग मशीननें केलेल्या खोदकामाचे दर मुंबई सरकारनें ठरविले आहेत. ते पुढीलप्रमाणें आहेत :—

| खोली फूट | चार इंची बोअर प्रत्येक फुटास रु. | सहा इंची बोअर प्रत्येक फुटास रु. | आठ इंची बोअर प्रत्येक फुटास रु. |
|---|---|---|---|
| ० ते १०० | ९ | ११ | १४ |
| १०१ ते २०० | १० | १२ | १५ |
| २०१ ते ३०० | ११ | १३ | १६ |
| ३०१ ते ४०० | १२½ | १४½ | १७½ |
| ४०१ ते ५०० | १४ | १६ | १९ |

हे दर ठरविण्यासाठी खोली विहिरीच्या तळापासून न मोजतां जमिनीच्या पातळीपासून मोजली जाईल. याबाबत येणाऱ्या खर्चाच्या सर्व बाबींचा विचार करूनच हे दर ठरविले असल्यामुळें शेतकऱ्याला वर उल्लेखिलेल्या खर्चाशिवाय इतर खर्च करावा लागणार नाहीं. केसिंग पाईप, शू कटर, सॉकेट, ने-आण, मजुरी व पहारा या सर्व गोष्टींची सरकारमार्फतच व्यवस्था होईल.

---

### अमेरिकेंतील घरें बांधण्याची प्रगति

घरें बांधण्याबद्दलचें बिल अमेरिकन सीनेटमध्यें नुकतेंच पास झालें. सामाजिक कायदे करण्याची प्रगति यावरून दिसून येते. प्रेसिडेंट ट्रूमन ह्यांच्या कार्यक्रमांत घरें बांधण्याच्या बिलाला विशेष स्थान आहे. पुढील सहा वर्षांत ८ लक्ष, १० हजार घरें बांधलीं जावीं असें ह्या बिलानें ठरविण्यांत आलें आहे. यांपैकी दरवर्षी किती घरें बांधलीं जावीं हें बदलणाऱ्या परिस्थितीनुसार ठरविण्याचा अधिकार अध्यक्षांना देण्यांत आला आहे. ह्या बिलान्वयें नुसतीं घरें बांधण्याची योजना आखण्यांत आली असें नव्हे; तर प्रथम वाईट व गलिच्छ भाग स्वच्छ केले जातील, व बांधण्याची किंमत शक्य तितकी कमी व्हावी यासाठी जरूर तें संशोधनहि केलें जाईल. वाईट व गलिच्छ भाग स्वच्छ करण्यासाठी लागणारा खर्च फेडरल सरकार व स्थानिक सरकार, दोहोंस एक ह्या प्रमाणांत वाटून घेतील. वाईट व गलिच्छ भाग स्वच्छ करण्यासाठी १०० कोटी डॉलर्स कर्ज व ५० कोटी डॉलर्स भेंट देण्यांत येईल.

---

### इं. फि. कॉर्पोरेशनचे शेअर्स विमा कायद्यास मान्य

विमा कायद्यानें मान्यता दिलेल्या कर्जरोख्यांत इंडस्ट्रियल फिनॅन्स कॉर्पोरेशनच्या शेअर्सचा समावेश करणारी, कायद्यांत दुरुस्ती करण्यांत येणार आहे.

---

**सोव्हिएट राशिआंतील शिक्षण**—सोव्हिएट राशिआंत सामान्य व तांत्रिक शिक्षणाच्या मिळून २,२०,००० शाळा आहेत. ह्या शाळांतून ३,४५,००,००० विद्यार्थी शिकत आहेत. सोव्हिएट राशिआंतील शाळांतून एकूण १३,००,००० शिक्षक काम करीत आहेत. प्राथमिक शाळांत परीक्षेंत उत्तीर्ण होणाऱ्या मुलांपैकी ९० टक्के मुलें दुय्यम शाळांतून पुढील शिक्षण घेतात.

**अमेरिकन मोटारींना लागणारें सामान**—मोटार तयार करण्यासाठी निरनिराळ्या ५६ देशांत तयार होणाऱ्या मालाची गरज लागते. न्यूयॉर्कमध्यें साजरा झालेल्या जागतिक-व्यापार सप्ताहांत ही माहिती देणारी एक फिल्मच दाखविण्यांत आली होती.

बेडेकर
लोणच्याचा
तयार मसाला

दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.
—पुणें शाखा—
१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.
आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.
एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :
ब्रँच सेक्रेटरी.

उत्पादकांच्या सहकारी सोसायट्यांनीं तयार केलेला
ग्रामोद्योगाचा माल खरेदी करा.
ह्या मालाची किंमत माफक असून, तो मजबूत व टिकाऊ आहे.
टोप्यांचें लायनिंग, चप्पल, कातडीं, हातमागावरील व पॉवरलूमवरील कापड, नक्षीदार व कलात्मक वस्तू, इत्यादींसाठी चौकशी करा:—
दि प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह असोसिएशन, लि.
९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.
तार : SAHYOG फोन : ३४५१९
औद्योगिक सहकारावरील आमचीं प्रकाशनें
(१) ऑर्गनायझेशन ऑफ इंडस्ट्रिअल कोऑपरेटिव्हज (ले.:—जे. बी. टेलर, किं. १ रु. ८ आ.)
(२) इंडस्ट्रिअल कोऑपरेशन (ले.:—जे. बी. टेलर, किं. १ रु.)
(३) कोऑपरेटिव्ह मॅनेजमेंट (ले :—. रेवि ॲले, किं. २ रु.)
(४) इंडस्ट्रिअल कोऑपरेटिव्हज ॲंड व्हिलेज इंडस्ट्रीज इन बॉंबे प्रॉव्हिन्स (ले.:— एल. एन. रेणु, किं. १ रु. ४ आ.)

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.